## प्रकरण सहावे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण ६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीसंबंधीचे विचार

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलितांच्या मुक्ती लढयाचे नेते, विद्वान कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ, कामगार नेते, सक्रिय राजकारणी, ध्येयवादी पत्रकार अशा विविध विभूषणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिचित आहेत. त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी पार पाडली आहे. थोर विचारवंत, कृतिशिल समाजसुधारक, राजकारणी अशा वेगवेगळया क्षेत्रातील डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व व कर्तृत्व सर्वमान्य झाले आहे. भारताचा महामानव या नात्याने त्यांच्या कार्याचे आजही स्मरण केले जाते.

भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म महू येथे १४ एप्रिल १८८१ रोजी एका अस्पृश्य जातीत झाला. त्यांचे वडिल व आजोबा दोघेही सैन्यात होते. रामजी हे सरळ स्वभावी व धार्मिक वृत्तीचे होते. रामजींना १४ अपत्ये झाली. भिमराव हे रामजींचे शेवटचे अपत्य होते.

बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण दापोली (जि. रत्नागिरी) येथील मराठी शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण सातारा येथे झाले. १९०७ साली आंबेडकर मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. १९१२ साली ते बी. ए. झाले. १९१३ मध्ये बडोद्याचे सरकार सयाजीराव गायकवाड यांच्या सहकार्याने उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेला रवाना झाले. कोलंबिया विद्यापीठ त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. हेरॉल्ड लास्की, किंगस्ले मार्टिने, एडविन कॅनन, सिडने वेब यांनी त्यांच्या विद्वत्तेची प्रशंसा केली.(१)

आंबेडकरांनी वेगवेगळया विषयावर संशोधन व लेखन केले. १९२३ साली लंडन विद्यापीठात अर्थशास्त्रातील त्यांच्या The Problems of Rupee या प्रबंधाबद्दल डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी दिली. तर Administration and Finance of the East India Company या विषयावर एम्. ए. ची

पदवी मिळाल्यानंतर १९१६ साली त्यांनी कोलंबिया विद्यापीठात भारताच्या राष्ट्रीय नफ्यातील वाटयाविषयी चिकित्सक दृष्टिने अभ्यास सुरू केला. या विषयावर सादर केलेल्या The Evolution of Provincial Finance in British India या प्रबंधावरील आंबेडकरांना पीएच्. डी. पदवी मिळाली.(२)

भारतात परत आल्यानंतर त्यांनी वकिली व्यवसायास सुरुवात केली. त्यानंतर काही काळ सरकारी विधि महाविद्यालयात प्रथम प्राध्यापक नंतर प्राचार्य म्हणून काम पाहिले. याच काळात ते सामाजिक कार्यातही भाग घेऊ लागले. बालवयातच बाबासाहेबांनाच अस्पृश्यतेमुळे मिळणाऱ्या अन्यायकारक वागणूकीची जाणीव झाली होती. त्यामुळे या अनिष्ट जातीसंस्थेविरुध्द लढा देण्याच त्यांनी निर्धार केला. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे प्रोत्साहन त्यांना मिळाले. त्यांच्या एकंदर कार्यावर व विचारांवर या सर्वांचा प्रभाव होता. परंतु विशेषतः त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या कार्याची विशेष छाप होती. आंबेडकर महात्मा फुले यांना आपले गुरू मानीत. महात्मा फुले यांनी सामाजिक समतेसाठी सुरु केलेला लढा त्यांनी पुढे चालविला. हिंदू धर्मातील तत्त्वांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. विषमता मूलक जाति-वर्णव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचे निर्मूलन करणे हे त्यांच्या विचारांचे व कार्याचे मुख्य सूत्र होते. त्यांनी हिंदू धर्मातील अन्यायकारक रुढी, विषम समाजव्यवस्था यांना आव्हान दिले व दलितांच्या हक्कांविषयी चळवळीला एक नवीन वळण दिले.(३)

डॉ. आंबेडकर ध्येयवादी पत्रकारही होते. वृत्तपत्राच्या क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे एक प्रभावी माध्यम आहे हे त्यांनी ओळखले. राजर्षी शाहू महाराजांच्या मदतीने ३१ जानेवारी १९२० रोजी त्यांनी त्यांनी मूकनायक हे पाक्षिक सुरु केले.(२) त्यानंतर महाड सत्याग्रहाच्या वेळी त्यांनी बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरु केले. तसेच २९ जून १९२८ मध्ये समता पत्र, प्रबुध्द भारत अशी पाक्षिके काढली. परंतु व्यवस्थापकीय गोंधळ व आर्थिक टंचाईमुळे ती सर्व अल्पजीवी ठरली.(४)

आंबेडकरांची लेखनशैली वैशिष्टयपूर्ण होती. त्यांचे लेखन तर्कशुध्द, आक्रमक, सडेतोड युक्तीवाद असे होत. या विविध पाक्षिकांमधून विशेषत: बहिष्कृत भारतातून त्यांनी सामाजिक व आर्थिक विषमतेचे स्वरुप यावर अनेक अग्रलेख व स्पष्ट लेख लिहिले. हिंदू समाजाच्या विघटनास कारणीभूत असणाऱ्या जातिप्रथेविरुध्द निर्भिड विचार त्यांनी विविध लेखांमधून मांडले.

भारतीय स्वातंत्र्य जसजसे जवळ येऊ लागले आणि मुसलमानांनी आपले वेगळे राष्ट्रीयत्व आहे असे म्हणावयास सुरुवात केली तेव्हा आंबेडकरांनी पाकिस्तान संबंधी विचार **'पाकिस्तान अथवा भारताची फाळणी'** या शिर्षकाखालील ग्रंथातून आपले विचार प्रदर्शित केले. डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन परिस्थितीची गरज म्हणून हा ग्रंथ लिहिलेला आहे. या ग्रंथाचे शीर्षकच मुळी या ग्रंथात मुस्लिम प्रश्नांच्यापेक्षा अधिक काहीतरी आहे हे सूचित करते. या ग्रंथात मुस्लिम प्रश्नाची चर्चा विस्ताराने केलेली दिसते. परंतु खुद्द आंबेडकरांना मात्र तसे वाटत नाही. या ग्रंथाच्या १९४५ साली प्रसिध्द झालेल्या दुसऱ्या आवृत्तीला जोडलेल्या प्रस्तावनेत आंबेडकर म्हणतात - हा ग्रंथ त्यांच्या नावावरुनच केवळ पाकिस्तानच्या सामान्य माहितीशी संबंधित आहे असे वाटण्याचा संभव आहे. परंतु ते त्यापेक्षा काही अधिक सांगणारा आहे. हा ग्रंथ म्हणजे भारतीय इतिहास आणि राजकारण यांच्या जातीय स्वरुपाची चिकित्सा आहे. या ग्रंथाचे स्वरुप पाकिस्तानवरील सामान्य प्रबंधापेक्षाही काहीसे अधिक आहे. या ग्रंथात समाविष्ठ केलेली भारतीय इतिहास आणि राजकारणावरील माहिती इतकी विस्तृत आणि विविध प्रकारची आहे की त्याला भारतीय राजकारणाचे वास्तव स्वरुप असेच म्हणावे लागेल.(५)

**'पाकिस्तान अथवा भारताची फाळणी'** हा ग्रंथ केवळ मुस्लिम प्रश्नाची चर्चा करणारा नसून एकूण भारतीय इतिहास आणि राजकारणाच्या संदर्भात या प्रश्नांची चर्चा आंबेडकरांनी कशी केली आहे आणि पाकिस्तानला पर्याय काय असू शकते, या संबंधीचे विवेचन आंबेडकरांनी केले आहे.

मुसलमान आणि त्यांचे प्रश्न हा भारतीय राजकारणातला नेहमीच महत्त्वाचा प्रश्न राहिला आहे. त्याच्या काही महत्त्वाच्या अंगांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही लेखातून प्रकाश टाकला आहे. ब्रिटीश सरकारने हिंदू आणि मुसलमान असे दोन गट कायमचे राहावेत, हिंदी राष्ट्रीयत्वाची कल्पना नष्ट व्हावी, हिंदू - मुसलमानातील दुही कायम राहावी यासाठी ब्रिटीश सरकारने जातीय प्रतिनिधीत्व आणि स्वतंत्र मतदारसंघाची निर्मिती केली असा आरोप ब्रिटीश सरकारवरती श्री. विठ्ठलराव चंदावरकर यांनी १९४१ साली झालेल्या कलकत्ता येथील नॅशनल लिबरल फेडरेशनच्या अधिवेशनात केला. डॉ. आंबेडकर या विचारसरणीशी सहमत नव्हते. ते म्हणतात की - राष्ट्रीय सभेने सुचविल्यावरून व सरकारला ते पटल्यावर १८९२ चा कायदा झाला आणि मुसलमानांचे प्रतिनिधी सरकारने नेमण्यास सुरुवात झाली. या वेळेपासून मुसलमान समाजाला कळून आले की, आपल्याला राजकीय हक्क जर प्राप्त झाले तर त्याचा सामाजिक जीवनावर प्रभाव पडतो. १९०९ साली कायदेमंडळाच्या सुधारणांचा प्रश्न आला तेव्हा मुसलमान वर्ग अधिक जागृत राहिला आणि त्यावेळी त्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या.(६)

१९१६ मध्ये कायदेमंडळाच्या सुधारणासंबंधी व्हाइसरॉयकडे एक खलिता पाठविण्यात आला. त्यावेळी त्यामध्ये मुस्लिमांनी संधी सोडली नाही. लखनौ करार तर ज्या हिंदू-मुसलमान नेत्यांत वाटाघाटी झाल्या त्याचा लाभ मुसलमानांनाच अधिक झाला. वरिष्ठ कायदेमंडळात सर्व हिंदी लोकनियुक्त सभासदांच्या संख्येपैकी मुसलमानांची संख्या एक तृतीयांश असावी व त्याची निवडणूक स्वतंत्र मतदार संघामार्फत व्हावी. या करारामुळे मुसलमानांना अपूर्व यश मिळाले.

या करारास लोकमान्य टिळकांची मान्यता होती. १९०९ सालच्या मानाने कितीतरी अधिक महत्त्व १९१६ च्या लखनौ कराराने मुसलमानास मिळाले. १९२८ साली सायमन कमिशनपुढेही मुसलमानांनी आपल्या मागण्यांची यादी सादर केली होती. पण सायमन कमिशनने डाळ शिजू दिली नव्हती.

सायमन कमिशनने झिडकारले असले तरी सरकारने मुसलमानांना सवलती दिल्याच होत्या. अशा रितीने मुसलमानांनी सरकारकडून लागोपाठ सवलती बळकावल्या. त्यामुळे हिंदूंच्या मनात सरकारविषयी अप्रिती निर्माण झाली. पण हे सत्र थांबले नव्हते.(७)

१९३८ साली नेहरू-जीना यांच्यात जो पत्रव्यवहार झाला त्यात मुसलमानांच्या मागण्यांना अंत नव्हता. एवढेच नाही तर राष्ट्रभाषा, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वज या बाबतीतही त्यांच्या स्वतंत्र मागण्या होत्या आणि रक्तपात घडविण्याचीही भाषा बोलली जात होती. या सर्व प्रकारामुळे हिंदी राजकारणाला एक वेगळे वळण लागण्याचीही चिन्हे दिसू लागली होती. मुसलमान पध्दतीशीरपणे मार्गक्रमण करीत असल्यामुळे काही हिंदूंनी जीनांना दोष देऊन जीनांची सुलतानशाही बळावत चालली आहे, असा ओरडा केला. बाबासाहेबांच्या मते ओरडण्यात काहीच अर्थ नव्हता.(८)

बाबासाहेबांच्या मते, १८७७ साली सर सय्यद अहमद यांनी मुसलमान समाजाने काँग्रेसमध्ये सामील होऊ नये असे जे सांगितले होते त्याचे पध्दतशीर प्रयत्न मुसलमानांचे स्वतंत्र अस्तित्व हे होते. एवढेच नाही तर त्याने मुस्लिमांसाठी मुस्लिम लीग या पक्षाची सुध्दा स्थापना केली. या गोष्टीचा आढावा घेऊन डॉ. बाबासाहेबांनी असा निष्कर्ष काढला की, आज इंग्रज सरकारला शरण आणण्याची ताकद जर कोणामध्ये असेल तर ती काँग्रेसमध्ये किंवा हिंदू महासभेत नसून फक्त एकटया मुस्लिम लीगमध्ये आहे असे म्हणावयास हरकत नाही असे मत बाबासाहेबांनी मांडले.(९)

मध्यवर्ती कार्यकारी मंडळात तर मुसलमानांना पन्नास टक्के प्रतिनिधीत्व मिळणे म्हणजे इंग्रज सरकार हे मुसलमानांच्या घरी गहाण पडले आहे अशी कडवट प्रतिक्रिया बाबासाहेबांनी व्यक्त केली आणि मुसलमानांना यायोगे पाकिस्तानचा आगाऊ मोबदला देऊन टाकला असा ताशेराही मारला. परंतु इंग्रज सरकार मुत्सद्दी आहे, धोरणी आहे, व्यवहारी आहे, स्वार्थपरायण आहे, त्यामुळे सहजासहजी ते हिंदूंच्या बाजूला झुकेल असे नाही, मुसलमानांच्या

आहारी जाईल असे नाही. ते हिंदुस्तानचे राज्य कदापिही सोडणार नाही असा ठाम विचार बाबासाहेबांनी मांडला.(१०)

डॉ. बाबासाहेबांच्या मते, हिंदू-मुसलमानांच्या कलहाचे मूळ कारण धार्मिकच आहे. धर्माच्या बुरख्याखाली परस्परांशी भांडण्याची ईर्ष्या सत्यप्रवृत्त व सद्धर्मप्रेरक नाही. आंबेडकरांच्या मते - "धर्माला पदोपदी लाथाडणारे लोक धर्माचा आवेश दाखूवन दुसऱ्या धर्माच्या लोकांचे प्राण घेऊ पाहतात. धमार्ने माणसाला देवदूत बनविले पाहिजे. परंतु तसे न होता, धार्मिक कलहांमुळे धर्माच्या योगाने माणसाचे माणूसपण जाऊन त्याला पशुपण येत आहे."(११) या पशुत्वाचा अविष्कार म्हणजे परस्परांवर केलेले शारिरीक हल्ले. दोन्ही धर्मातील अशिक्षीत लोक त्याचा अवलंब करतात. पण त्यामागे जी शक्ती कार्यरत असते तिला बाबासाहेब सुशिक्षीत गुंड प्रवृत्ती म्हणतात. सुशिक्षित गुंडांना समाजात लोकप्रियता मिळविण्याची संधी हवी असते. हिंदू व मुस्लिम या दोन्ही धर्मात सुशिक्षीत गुंड वावरत असतात. त्यांचा सुशिक्षीतपणा हे शुध्द ढोंग असते. हा ढोंगीपण सतत खाद्याच्या शोधात असतो. त्याला कोणत्या वेळी कोणते खाद्य लागेल याचा नेम नसतो असे बाबासाहेबांचे मत होते.

कटवट धार्मिक प्रेरणांमुळे हिंदुस्तान हिंदू-मुस्लिम कलह अटळ आहे असा बाबासाहेबांचा सिध्दांत आहे. कधीकाळच्या सत्तासामर्थ्याची परिणती धार्मिक कलहात होते आणि सामाजिक तणव निर्माण होऊन दुभंगलेपण अस्तित्वात येते. बाबासाहेब म्हणतात की, हिंदुस्तानच्या दृष्टिने ही बात अत्यंत घातक असली तरी ती अटळ आहे. मुसलमानांचा अनुनय करण्याची एक परंपरा भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात होती आणि आजही ती खंडित झालेली नाही हे भारतासाठी घातक ठरले आहे असे दिसून येते.(१२)

काँग्रेसने १९२७ साली घटना लिहिण्यासाठी मोतीलाल नेहरु कमिटी स्थापन केली होती. स्वराज्यातील राज्यघटनेचे प्रारुप कसे असेल याचा उहापोह या अहवालात करण्यात आला होता. या समितीच्या अहवालावरती डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी परखड टीका केली. नेहरू कमिटीने काय साधले याचे मोठे मजेशीर वर्णन बाबासाहेबांनी केले आहे.

त्यांच्या मते - हिंदू समाजात साटंलोटीच्या लग्नाची पध्दत आहे. त्यात 'अ' ची बहिण 'ब' ला आणि 'ब' ची बहिण 'अ' ला देऊन सोयरसंबंध करण्यात येतो. हेतू हा की 'अ' ने जर 'ब' च्या बहिणीला जाच केला तर 'ब' ने 'अ' च्या बहिणीला जाच करून एकमेकांनी एकमेकांस ताळयावर आणीत राहावे. नेहरु कमिटीची प्रांतरचना म्हणजे हिंदू - मुसलमानातील एका प्रकारचे साटेलोटीचे लग्न आहे असे म्हणावयास हरकत नाही.(१३)

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांनी नेहरु कमिटीवरती टीका केली. कारण नेहरू कमिटीने प्रांतिक सरकारवर मध्यवर्ती सरकारचे नियंत्रण नसावे या मुसलमान मागणीचा स्वीकार केला. यामुळे प्रांतिक सरकारे अनियंत्रित होणार होती. याचा परिणाम देशावर झाला असता व एखाद्या समाजाचे अकारण महत्त्व वाढले असते असे आंबेडकरांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना असे वाटत होते की राष्ट्रांशी संबंधित असा राष्ट्रवाद हा सामाजिक ऐक्याच्या दृढ भावनेवर आधारित असला पाहिजे आणि आंतरराष्ट्रीयवादाशी संबंधीत राष्ट्रवाद हा मानवी बंधुतेवर आधारला पाहिजे. तसेच राष्ट्रवाद हा कोणत्याही जमातीला वा देशाला जुलूम वा धोका वाटता काम नये.

आंबेडकरांच्या मते मुसलमान हे प्रथम स्वतःला समाज असे म्हणवून घेत होते. नंतर ते राष्ट्र असे म्हणवून घेऊ लागले. यासंबंधी दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. (१) राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रगट यातील फरक ध्यानांत घ्यावयास पाहिजे. राष्ट्रगट म्हणजे बंधुभावाची जाणीव असे म्हणता येईल पण बंधुभावाने एकत्रित आलेल्या लोकांची स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्वाबाबतची तीव्र इच्छा म्हणजेच राष्ट्रीयत्व. (२) राष्ट्रगटाची भावना अस्तित्वात असल्याशिवाय राष्ट्रीयत्व साकार होऊ शकत नव्हते. राष्ट्रीयत्वामुळे निराळे अस्तित्व साकार होते. राष्ट्रीयत्वामुळे भूमी व्यापली जाते. त्यातून राज्य निर्माण होते आणि

राष्ट्राचे सांस्कृतिक प्रतिष्ठान साकार होते. जमातीला संरक्षक बंधने असतात. उलट राष्ट्र निराळे अस्तित्व सिध्द करते. या सर्वांचा विचार करुन आंबेडकरांच्या मते मुसलमान हे जमातीपासून राष्ट्राकडे गेल्याचे दिसते.(१४)

आंबेडकरांच्या मते, पाकिस्तानच्या सरहद्दी निश्चितपणे जाहीर न करण्यात जीनांनी जो हटवादीपणा दाखवला तो मुत्सद्दयाला न शोभणारा व अक्षम्य असा होता. जीनांचे त्यांच्या जमातीवरील वजन दिन प्रतिदिन वाढत होते. लढयासाठी ते सर्व तयारी करीत होते. ही गोष्ट गांधीजींना माहिती नाही असे त्यांना वाटते. जीना हे जनतेचे पुढारी कधीच नव्हते. काँग्रेसमध्ये असताना जीनांनी काँग्रेसचे सदस्यत्व मॅट्रिक झालेल्यांनाच द्यावे असे सुचविले होते. जनतेवर त्यांचा विश्वास नव्हता. जनतेला अधिकारापासून वंचित करण्यासाठी वरिष्ठ वर्गियांनाच मताधिकार असावा असे मत त्यांनी मांडले होते. जीना हे धर्मशील, पवित्र किंवा कुराणाप्रमाणे वागणारे मुसलमान नव्हते. धार्मिक प्राथनेसाठी किंवा उत्सुकता म्हणून तरी ते एखाद्या मशिदीत गेले होते की नव्हते याबद्दल जबरदस्त शंका होती. मुसलमानांच्या धार्मिक मेळाव्यात किंवा राजकीय परिषदेत ते कधीही सापडत नव्हते. पण नंतर मुस्लिम जनतेचे प्रतिक म्हणून लोक त्यांना ओळखू लागले आणि त्यांना कायदेआजम संबोधण्यात येऊ लागले. इस्लामवर त्यांची निष्ठा होती असेच नसून इस्लामसाठी मरावयास ते तयार असल्याचे दिसून येऊ लागले. नुसत्या कलमा पठणापेक्षा त्यांना इस्लाम विषयी भरपूर ज्ञान प्राप्त झालेले दिसत होते अशा शब्दांत जीनांचे वर्णन आंबेडकरांनी केले आहे.(१५)

आंबेडकरांचया मते कॅनडातील फ्रेंच वंशीय रहिवाशांनी त्या देशात त्यांना प्राप्त झालेले स्थान जसे स्वीकारले तसे भारतीय मुसलमान स्वीकारण्यास तयार नसल्यामुळेच ते स्वतःला एक जमात म्हणवून घेण्याऐवजी स्वतंत्र राष्ट्र म्हणवून घेऊ लागले.

आंबेडकरांना असे वाटत होते की, मुस्लिम लीगला मुसलमानांची एकमेव प्रतिनिधीक संघटना म्हणून मान्यता घ्यावयाची की नाही यावर तसेच

संयुक्त मंत्रिमंडळे बनविण्याच्या प्रश्नावर कॉंग्रेस आणि लीग या दोघांनीही एकांतिक भूमिका स्वीकारल्यामुळे त्यांच्यातील तेढ वाढत गेली आहे. अल्पसंख्यंकांपैकी जे प्रभावी ठरु शकतील अशा प्रतिनिधींना सत्तेत सहभागी करुन घेण्याची कॉंग्रेसची इच्छा नसल्यामुळे तिने मुसलमानांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवले होते. लीगचे कॉंग्रेसबद्दलचे आक्षेप अतिरंजित आहेत यात शंकाच नाही. परंतु तसे करण्यात काही तरी कुभांड रचून सत्ता मिळविण्याचीच लीगची योजना होती असे आंबेडकरांच्या लक्षात येते.(१६)

आंबेडकर म्हणतात, पाकिस्तानच्या निर्मितीमुळे हिंदुस्तानच्या संरक्षण क्षमतेत उणेपणा येईल हा युक्तिवादही चुकीचा आहे. कारण गेल्या शंभराहूनही अधिक वर्ष भारतीय सैन्य दलात मुसलमानांचे प्रभुत्व आहे आणि ते देखील पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातील मुसलमानांचे अफगाणिस्तानने स्वारी केली तर पंजाब आणि वायव्य सरहद्द या प्रांतातील फौजा कशा वागतील हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून तो अप्रिय वाटला तरी त्याला सामोरे जावेच लागेल त्यामुळे हिंदूंच्या पुढे एक विकल्प उभा आहे. आपली सरहद्द सुरक्षित ठेवायची की विश्वासू सैन्य ठेवायचे. शिवाय मुख्यत: मुसलमानांचा भरणा असलेल्या या पाकिस्तानी प्रांतातील सैन्य दलाला हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांताकडूनच प्रचंड मोठया प्रमाणावर रसद पोहचविली जाते. तेव्हा या मुद्यावर पाकिस्तानला विरोध करणे म्हणजे आत्मनाशासाठी स्वत:चे अमोघ शस्त्र खरेदी करण्यासारखे होणार आहे. सरहद्द सुरक्षित असण्यापेक्षा सैन्य भरवशाचे असणे हे नेहमी अधिक हिताचे असते असे आंबेडकरांचे मत होते.(१७)

आंबेडकरांच्या मते मुस्लिमांनी सामाजिक सुधारणांना महत्त्व दिले नव्हते. त्याबाबत मुस्लिम समाज प्रगतशील नव्हता. भारतातील मुसलमानांना सामाजिक सुधारणा घडवून आणण्याकरता पध्दतशीर अशी चळवळ झालेलीच नव्हती. अशा परिस्थितीत मुसलमान समाजाची प्रगती न होता तो समाज गतिशून्य होऊ लागला होता. धर्मनिरपेक्ष अशी काही राजकीय मूल्ये असतात व त्यांची भारतीय राजकारणात आवश्यकता होती. याची त्यांना जाणीवच झाली

नव्हती. त्यामुळे वैरत्व वाढते व ते समाजात पसरते. त्यामुळे भारतीय राजकारणात हिंदू - मुसलमानांचा लढा ही विसाव्या शतकात तिसऱ्या दशकात गृहीत गोष्ट झाली. त्या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय कोणत्याही राजकीय प्रश्नाला हात घातला जात नव्हता. ब्रिटीश अंमलाखालून देशाची मुक्तता करावी, स्वतंत्र भारत निर्माण करावा ही आकांक्षा राष्ट्रात निर्माण झाली. पण याच प्रमाणात देशात हिंदू-मुस्लिम तेढही वाढत गेली. मुस्लीम लीगचे पुढारी महंमद अली जीना यांनी तर एकदा व्यभिचारी व भ्रष्ट असा मुसलमान गांधींच्यापेक्षा श्रेष्ठ होय, असे उद्‌गार काढले. त्यामुळे जातीय भावनेचा अंगार अधिकच फुलू लागला, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.(१८)

पाकिस्तान निर्मितीचा प्रश्न हा काही ब्रिटीशांनी निर्माण केलेला प्रश्न नाही. तर तो हिंदू आणि मुसलमान या दोन समुहाच्या इतिहासातून जन्मलेला प्रश्न असल्याने तो हिंदू आणि मुसलमान यांनीच आपापसात विचारविनीमय करु सोडवला पाहिजे. या विचार विनिमयात त्यांनी कोणाही अन्य तिसऱ्याला मध्ये आणू नये आणि ब्रिटीशांना तर मुळीच मध्यस्थी करु देऊ नये, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. कारण भारतीय प्रदेशाच्या विभाजनाचे कोणतेच सोयरसुतक ब्रिटीशांना नव्हते. म्हणूनच भारताचे विभाजन टाळण्यासाठी ब्रिटीश सत्ता बळाचा वापर करीत असे. जर हिंदूंना वाटत असेल तर त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. प्रत्येक राष्ट्रवादाला जसा परकीय आक्रमकांच्या गुलामीतून स्वतंत्र होण्यासाठी स्वयंनिर्णयाचा हक्क असला पाहिजे तसाच बहुसंख्यांकांच्या वसाहतवादातून अल्पसंख्याकांना मुक्त होण्यासाठी हक्क असला पाहिजे. परकीय वसाहतवादातून अल्पसंख्यांकावरील असलेला देशी वसाहतवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यापैकी कोणत्याही वसाहतवादाला पावित्र्य किंवा नैतिकता चिकटविता येणार नाही. या प्रश्नावर स्थूलमानाने आंबेडकरांची भूमिका होती.(१९)

पाकिस्तानच्या मागणीचे सार सर्व भारतभूमीला एका राजकीय छत्राखाली आणणाऱ्या केंद्रीय सरकारच्या अस्तित्वालाच नाकारण्यात आल्याने

आंबेडकर बैचेन होते आणि हा प्रश्न राज्यघटनेच्या निर्मितीपूर्वी सोडवावा असा त्यांचा आग्रह होता.

आंबेडकर लिहितात की, फाळणी जर घडणार असेल तर ते नव्या राज्यघटनेच्या निर्मितीपूर्वीच घडलेले बरे, परंतु जर का ते एक केंद्रीय सत्ता असलेल्या राज्यघटनेच्या स्वीकारानंतर घडले तर तो सर्वात मोठा अनर्थ असेल. या उलथापालथीत केवळ भारताच्या अस्तित्वाचाच विध्वसं होईल. असे झाले नाही तर हिंदूंचे ऐक्य कोणालाही वाचविता येणार नाही, असे मत आंबेडकरांनी मांडले.(२०)

आंबेडकरांचे हे विचार त्यांच्या अंत:करणात भारतभूमीच्या ऐक्याचा विचार किती खोलवर रुजला होता, त्याची स्पष्ट कल्पना देणारे आहेत.

आंबेडकरांचे पाकिस्तानविषयी वरील विवेचनातून असे लक्षात येते की, आंबेडकरांनी पाकिस्तान होऊ नये असे वाटत होते. परंतु हिंदू-मुस्लिम संघर्ष होणार असेल. मुस्लिम पाकिस्तान मागणीशी आग्रही असतील तर त्यांना वेगळे अस्तित्व द्यावे. हा प्रश्न विचारविनीमयातून सोडवावा असा ही सल्ला आंबेडकरांनी दिला आहे. आंबेडकरांनी पाकिस्तान प्रश्नाचा खोलवर जाऊन विचार केल्याचे दिसून येते. जातीय आक्रमकता, राजकीय भवितव्यता, या गोष्टी फाळणीस कारणीभूत ठरल्याचे आंबेडकरांना वाटत होते.

# संदर्भसूची


१ शेषराव मोरे - डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, राजहंस प्रकाशन, पुणे १९९८, पृ. २४ ते २६.

२ पूर्वोक्त... पृ. २५. डॉ. कुबेर वा. न. - डॉ. आंबेडकर विचारमंथन, केसरी प्रकाशन पुणे, १९७२, पृ. ६ ते ९.

३ पूर्वोक्त... पृ. ९.

४ आंबेडकर बी. आर. - पाकिस्तान अथवा भारताची फाळणी, मुंबई ठाकेर, दुसरी आवृत्ती, १९४५, प्रस्तावना.

५ धनंजय कीर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद गजानन सुर्वे)पॉप्युलर प्रकाशन, नवी दिल्ली, १९९७, पृ. ७०.

६ पूर्वोक्त... पृ. ७१.

७ चंदावरकरांच्या उलटया बोंबा - जनता, २२ जानेवारी १९४१.

८ ही घाण उपसायची कोणी - जनता, ४ जानेवारी १९४१.

९ पूर्वोक्त...

१० बॅ. सावरकरांचा दुराग्रह - जनता, १८ जानेवारी १९४१.

११ ढोंगीपणा, माथेफिरुपणा व गैरमुत्सद्दीपणा - बहिष्कृत भारत, १२ ऑगस्ट १९२७.

१२ नेहरु कमिटी योजना व हिंदुस्तानचे भवितव्य - बहिष्कृत भारत, १८ जानेवारी १९२९.

१३ डॉ. गंगाधर पानतावणे - पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अभिजीत प्रकाशन, नागपूर, १९८७, पृ. ४७.

१४ डॉ. कुबेर वा. न. - डॉ. आंबेडकर विचारमंथन, केसरी प्रकाशन पुणे, १९७२, पृ. २१५ ते २१९.

१५ पूर्वोक्त... २१६.

१६ पूर्वोक्त... २१८.

१७ आंबेडकर बी. आर. - पाकिस्तान अथवा भारताची फाळणी, मुंबई ठाकेर, दुसरी आवृत्ती, १९४५, पृ. २०१.

१८ पूर्वोक्त... २१४.

१९ पूर्वोक्त... २१९.